मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# शहरातील 'आरएमसी प्लँट'चे लवकरच सर्वेक्षण

## विनापरवानगी सुरू होते 'ऐश्वर्यम हमारा', 'सोमानी टॉवर्स'साठीचे आरएमसी प्लँट : बिल्डरकडे ना एमपीसीबी, ना महापालिकेची परवानगी

**पिंपरी | प्रतिनिधी**


पिंपरी-चिंचवड शहरात शेकडो बांधकाम व्यावसायिक हे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (एमपीसीबी) आणि महापालिकेच्या पर्यावरण विभागाकडून कोणतीही परवानगी न घेता रेडी मिक्स कॉंक्रिट (आरएमसी) प्लँट सुरू करत आहेत. यामध्ये पुनावळेतील सोमानी टॉवर्स आणि चिखलीतील 'ऐश्वर्यम हमारा' या दोन्ही गृहप्रकल्पांचे आरएमसीप्लँट हे विनापरवानगी पाच ते सात वर्षे सुरू होते. याकडे महापालिकेसह प्रदूषण नियंत्रण मंडळाचे देखील दुर्लक्ष होते. त्यामुळे महापालिकेने ते दोन्ही प्लँट बंद केले आहेत. यापुढे पर्यावरण विभागाकडून लवकरच शहरातील आरएमसी प्लँटचे सर्वेक्षण हाती घेणार असून कागदपत्रांची पडताळणी करण्यात येणार आहे.

शहरात रहिवासी भागात शेकडो बांधकाम व्यावसायिकांनी रेडी मिक्स कॉंक्रिट (आरएमसी) प्लँट उभा केलेले आहेत. या भागातील आएमसी प्लँटबाबत तेथील नागरिकांच्या वायू व ध्वनिप्रदूषणावर महापालिकेच्या पर्यावरण विभागाकडे तक्रारी येऊ लागल्या आहेत. नागरिकांच्या तक्रारी आलेल्या आरएमसी प्लँटच्या कागदपत्रांची पर्यावरण विभाग पथकाकडून पडताळणी केली असता त्या बांधकाम व्यावसायिकांकडे प्लँट सुरू करण्यासाठी अनिवार्य कागदपत्रे नसल्याचे आढळून आले आहे.

शहरातील आरएमसी प्लँटमधून मोठ्या प्रमाणात उडणाऱ्या धुळीमुळे नागरिकांना श्वसनाचा आणि त्या प्रकल्पामधून निघणाऱ्या आवाजामुळे ध्वनिप्रदूषणाचा त्रास होत असल्याच्या पालिकेच्या पर्यावरण विभागास पुनावळे, ताथवडे, वाकड, किवळे, मोशी, च-होली, चिखली, पिंपळे निलख या परिसरातून तक्रारी प्राप्त होत आहेत. नागरिकांच्या तक्रारींची दखल घेऊन महापालिकेने मे. एस.व्ही.टी.एन.कंन्स्ट्रक्शन प्रा. लि. तर्फे सोमानी टॉवर्स, पुनावळे, ऐश्वर्यम हमारा, चिखली येथे प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आणि महापालिकेचे ना-हरकत दाखला, इतर अनुषंगिक आवश्यक असणारी परवानगी घेणे अनिवार्य असते. परंतु कागदपत्र पडताळणीत त्या व्यावसायिकांनी कोणतीही परवानगी घेतली नसून अनधिकृतपणे व्यवसाय करत असल्याचे आढळून आले. त्यामुळेच महापालिकेने दोन्ही आरएमसी प्लँट कायमस्वरूपी बंद केले आहेत.

शहरात गृहनिर्माण प्रकल्पामुळे सर्वत्र 'आरएमसी' प्लँट कार्यरत आहेत. त्यामुळे होणाऱ्या ध्वनी व वायुप्रदूषणामुळे या भागातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत आहे. नागरिकांनी वारंवार तक्रारी केल्यानंतर महापालिकेने केलेल्या पाहणीत हे प्लँट विनापरवाना चालू असल्याचे उघडकीस येत आहे. महापालिका आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सर्व नियम धाब्यावर बसवून राजरोसपणे आरएमसी प्लँट सुरू आहेत. शहरात महापालिकेच्या पर्यावरण विभागाने केवळ ४० आरएमसी प्लँटला 'ना हरकत' दाखला दिलेला आहे. पण, क्षेत्रीय कार्यालयाकडून किती दाखले दिले यांची आकडेवारी उपलब्ध नाही. याबाबत नागरिकांच्या तक्रारी आल्यानंतर देखील अनेक आरएमसी प्लँट शहरात अद्यापही सुरू आहेत. पण, याची कोणतीही नोंद महापालिकेकडे नाही.

दरम्यान, वायू आणि ध्वनिप्रदूषणाबाबत नागरिकांच्या वाढत्या तक्रारी लक्षात घेता महापालिकेच्या पर्यावरण विभागाकडून शहरात लवकरच आरएमसी प्लँटचे सर्वेक्षण केले जाणार आहे.





### महापालिकेची एनओसी बंधनकारक

**» महापालिका हद्दीत 'आरएमसी' प्लँट सुरू करण्यासाठी बिल्डरला महापालिकेच्या पर्यावरण विभागाकडे अर्ज दाखल करून 'ना हरकत' दाखला घेणे बंधनकारक आहे. पर्यावरण कर्मचाऱ्यांकडून स्थळ पाहणी करून 'ना हरकत' प्रमाणपत्र दिले जाते. जून २०२३ नंतर क्षेत्रीय कार्यालयाकडून एनओसी दिली जात आहे. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून या प्लँटला परवानगी आवश्यक आहे. त्यानुसार शहरात ४० आरएमसी प्लँटला एनओसी दिलेली आहे. त्यामुळे शेकडो बिल्डरांकडे सुरू असलेले आरएमसी प्लँट विनापरवानगी सुरू असल्याचे निर्दशनास येत आहे.**

# पुणे-मुंबई महामार्गावर हवाई दलाचा टेम्पो उलटला

## भारतीय सैन्य दलाच्या वाहनाचा पिंपरीतील मोरवाडी चौकात अपघात : मोठी वाहतूक कोंडी

**पिंपरी | प्रतिनिधी**

जुन्या पुणे-मुंबई महामार्गावर मोरवाडीत समतल विलगकामध्ये ( ग्रेड सेपरेटर) हवाई दलाचा टेम्पो उलटला. दुचाकीस्वाराला वाचविताना टेम्पो उलटल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, यामुळे मोठी वाहतूक कोंडी झाली असून वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. ही घटना मंगळवारी दुपारी दोनच्या सुमारास घडली.

जुन्या पुणे-मुंबई महामार्गावरून हवाई दलाचा टेम्पो मुंबईच्या दिशेने जात होता. समतल विलगातून जात असताना मोरवाडीत टेम्पोला एक दुचाकीस्वार आडवा आला. त्याला वाचविताना टेम्पो उलटला. टेम्पोतून रस्त्यावर ऑइल गळती झाली आहे. रस्त्याच्या मध्यभागी टेम्पो उलटल्याने मोठी वाहतूक कोंडी झाली. खराळवाडीतून वाहनांच्या रांगा लागल्या आहेत.



पिंपरी पोलीस आणि वाहतूक विभागाचे पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहेत. अग्निशमन विभागाला बोलविण्यात आले. पाण्याने रस्ता धुवून काढला आहे. दरम्यान, टेम्पो सरळ करण्यासाठी क्रेन बोलविण्यात येणार आहे.

# पुण्यात घरभाडे वाढता वाढता वाढे..!

## गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा पहिल्या तिमाहीत हिंजवडीत 4 टक्के आणि वाघोलीत 7 टक्के घरभाडे वाढले

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यातील माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्या असलेल्या परिसरात घरभाड्यात सर्वाधिक वाढ होत आहे. हिंजवडी आणि वाघोलीत घरभाडे सर्वाधिक आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा पहिल्या तिमाहीत हिंजवडीत ४ टक्के आणि वाघोलीत ७ टक्के घरभाडे वाढले आहे.



अनारॉक ग्रुपने देशातील मालमत्ता क्षेत्राचा अहवाल जाहीर केला आहे. यात देशातील प्रमुख सात महानगरांचा आढावा घेण्यात आला आहे. त्यानुसार, पुण्यात हिंजवडी आणि वाघोलीत घरभाड्यात सर्वाधिक वाढ झाली आहे. हिंजवडीत २ बीएचके (१ हजार चौरस फूट) सदनिकेचे भाडे २०२२ च्या अखेरीस २१ हजार रुपये होते. ते २०२३ च्या अखेरीस २५ हजार ६०० रुपये आणि यंदा मार्चअखेरीस २६ हजार ५०० रुपयांवर पोहोचले. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा पहिल्या तिमाहीत घरभाडे ४ टक्क्यांनी वाढले आहे. वाघोलीत घरभाडे २०२२ च्या अखेरीस १७ हजार होते. ते २०२३ च्या अखेरीस २० हजार ६०० आणि यंदा मार्च अखेरीस २२ हजार रुपयांवर पोहोचले. गेल्या वर्षीच्या तुलनेत पहिल्या तिमाहीत घरभाडे ७ टक्क्यांनी वाढले आहे.

देशातील सात महानगरांचा विचार करता यंदा पहिल्या तिमाहीत सरासरी घरभाड्यात ४ ते ९ टक्के वाढ झाली आहे. घरभाड्यात वार्षिक ५ ते १० टक्के वाढ मोठी मानली जाते. साहजिकच त्याचा फायदा घरमालकांना होत असला तरी भाडेकरूंना त्याची आर्थिक झळ बसत आहे. देशात सर्वाधिक भाडेवाढ बंगळुरूत झाली आहे. बंगळुरूमध्ये पहिल्या तिमाहीत सर्जापूर रस्ता आणि व्हाईटफिल्ड रोज या भागात घरभाडे ८ टक्क्यांनी वाढले आहे. पहिल्या तिमाहीतील घरभाड्यातील वाढ दिल्लीत गोल्फ कोर्स ४ टक्के आणि नोएडा सेक्टर १५० मध्ये ९ टक्के, मुंबईत चेंबूर आणि मुलुंडमध्ये ४ टक्के, कोलकत्यात राजरहाट ३ टक्के आणि ईएम बायपास ५ टक्के, चेन्नईत पेराम्बूर आणि पल्लावरम भागात ४ टक्के, हैदराबादमध्ये हायटेक सिटी आणि गच्चीबाऊली भागात ५ टक्के आहे, असे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

### महानगरनिहाय सर्वाधिक घरभाडे (1 हजार चौरस फूट सदनिका)

| शहर | भाग | घरभाडे (रुपयांत) |
|---|---|---|
| बंगळुरू | सर्जापूर रस्ता | ३४ हजार |
| हैदराबाद | हायटेक सिटी | ३२ हजार ५०० |
| पुणे | हिंजवडी | २६ हजार ५०० |
| दिल्ली | गोल्फ कोर्स रस्ता | ४३ हजार |
| मुंबई | चेंबूर | ६२ हजार ५०० |
| कोलकता | ईएम बायपास | २७ हजार |
| चेन्नई | पेराम्बूर | २१ हजार |

> आगामी काळात घरभाड्यातील वाढ मंदावण्याची चिन्हे नाहीत. आगामी काही तिमाहींमध्ये घरांना मागणी वाढणार आहे. त्यामुळे चालू आर्थिक वर्षातील पहिल्या दोन तिमाहीत घरभाडे जास्त राहील.
>
> **- संतोष कुमार, उपाध्यक्ष, अनारॉक ग्रुप.**

# 'कारच्या धडके'ने अर्ध्या शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत!

## खडकवासला धरण परिसरातील विद्युत खांबाला कारची धडक : वारजे आणि नवीन पर्वती जलकेंद्राचा वीजपुरवठा खंडित

**पुणे | प्रतिनिधी**

खडकवासला धरण परिसरातील विद्युत खांबाला एका कार चालकाने जोराची धडक दिल्याने या भागातील वीज पुरवठा पाच तासांसाठी खंडीत झाला होता. यामुळे खडकवासला धरणातून महापालिकेच्या वारजे आणि नवीन पर्वती जलकेंद्राला पाणी पुरवठा करणाऱ्या जॅकवेलचा वीज पुरवठा सोमवारी (दि. २९) तब्बल साडेपाच तास खंडित झाला होता. शहरातील अर्ध्या भागाचा पाणीपुरवठा विस्कळीत झाल्याने नागरिकांना संताप व्यक्त केला. मात्र वीज पुरवठा सुरळीत झाल्यानंतर कमी दाबाने पाणीपुरवठा सुरळीत झाला. मंगळवारपासून नियमितपणे पाणीपुरवठा होणार असल्याचे पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख नंदकिशोर जगताप यांनी सांगितले.

खडकवासला रॉ वॉटर जॅकवेल पम्पिंग येथील महावितरण कंपनीचे विद्युत पुरवठा करणाऱ्या पोलला सकाळी सव्वाअकरा वाजता एका भरधाव चार चाकीने जोराची धडक दिली. या धडकेत हा पोल पडला. त्यामुळे महावितरण कंपनीचे विद्युत पुरवठा यंत्रणेमध्ये तांत्रिक बिघाड झाला. त्यामुळे या ठिकाणी असलेल्या पंप सव्वाअकरापासून बंद पडले.



ही माहिती मिळताच महावितरणकडून तत्काळ खांब उभारण्यासह वीज पुरवठा सुरळीत करण्याचे काम हाती घेण्यात आले. मात्र, वारजे जलकेंद्राचा पंप सुरू होण्यास चार वाजले तर साडेचार वाजता पर्वती जलकेंद्राचे पंप सुरू झाले. त्यानंतर, महापालिकेने पुन्हा पाणी घेण्यास सुरूवात केली. टाक्यांमध्ये आवश्यक पाणी आणि पुढील प्रक्रिया करण्यासह सहा वाजेपर्यंत वेळ गेला. परिणामी, दुपारचे पाण्याचे सर्व वेळापत्रक कोलमडले. त्यामुळे महापालिकेने अनेक भागात सायंकाळी उशीरा पाणी दिले असून मंगळवारपासून (दि. ३०) वेळापत्रकाप्रमाणे पाणी येणार असल्याचे पाणीपुरवठा विभागाने सांगितले.

खडकवासला धरणातून महापालिकेच्या वारजे आणि नवीन पर्वती जलकेंद्राला कच्च्या पाण्याचा पुरवठा केला जातो. या भागातील वीजपुरवठा खंडित झाल्याने पाणीपुरवठा बंद झाला होता. त्यामुळे या जलशुद्धीकरण केंद्राला कच्चे पाणी कमी पडले होते. मात्र पुन्हा पाणीपुरवठा सुरळीत झाल्यानंतर जलशुद्धीकरण केंद्रातून कमी दाबाने पाणीपुरवठा करण्यात आला आहे. सोमवारी दिवसभर अनेक भागात पाणी आले नाही. त्यामुळे नागरिकांच्या तक्रारी पाणीपुरवठा विभागाकडे वाढल्या होत्या. नागरिकांना पाणी मिळावे यासाठी ज्या भागात उशीराने पाणी आले त्या भागात अतिशय कमी वेळ तसेच कमी दाबाने पाणी देण्यात आले.

सकाळी साडेअकरा वाजता हा वीज पुरवठा खंडीत झाला होता. सायंकाळी चारनंतर तो सुरळीत झाला. प्रामुख्याने लष्कर जलकेंद्रातून पाणीपुरवठा केल्या जाणाऱ्या शहराच्या पूर्व भागात तसेच वारजे आणि पर्वती जलकेंद्रातून पाणी पुरवठा केल्या जाणाऱ्या शहराच्या पश्चिम भागाला सर्वाधिक फटका बसला.

### मोदी आले अन् पाणी गेले...

**» लोकसभा निवडणुकीचे पुणे जिल्ह्यातील महायुतीच्या चारही उमेदवारांच्या प्रचारासाठी हडपसर रस्त्यावरील रेसकोर्स मैदानावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते. त्यामुळे शहराला सोमवारी पोलीस छावणीचे स्वरुप आले होते. दिवसभर मोदींच्याच सभेची चर्चा रंगलेली असताना शहरातील अर्ध्या भागातील पाणीपुरवठा बंद झाल्याने नागरिक हैराण झाले होते. वेळापत्रकानुसार पाणी येईल, याची वाट बघत नागरिकांना दिवस पाण्याविना काढावा लागला. मोदींच्या सभेमुळे रस्त्यावर गर्दी असणार असे गृहीत धरत अनेकांनी घराबाहेर पडण्याचे टाळले. दिवसभर घराबाहेरही पडता न आल्याने मोदी आले अन् पाणी गेले, अशी भावना काही नागरिकांनी व्यक्त केली.**

# मतदानासाठी महापालिका कर्मचाऱ्यांना सुट्टी जाहीर

## अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांना मतदान करता यावे, यासाठी आवश्यक ते नियोजन करण्याचे आयुक्तांचे आदेश




**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ तसेच शिरूर लोकसभा मतदार संघात वास्तव्यास असलेल्या महापालिका कर्मचा-यांना निवडणुकीच्या दिवशी मतदान करता यावे, यासाठी सार्वजनिक सुट्टी जाहिर करण्यात आली आहे. तसेच अत्यावश्यक सेवेतील कर्मचा-यांना मतदान करता यावे, यासाठी आवश्यक ते नियोजन करण्याचे आदेश महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी दिले आहेत.

पिंपरी-चिंचवड महापालिकेचा काही भाग मावळ आणि शिरूर लोकसभा मतदारसंघात येतो. येत्या 13 मे रोजी या दोन्ही मतदारसंघासाठी मतदान होणार आहे. मतदानाचा टक्का वाढावा, यासाठी निवडणूक विभागाने जनजागृतीचे अनेक उपक्रम हाती घेतले आहेत. नागरिकांनी मतदान करून आपला हक्क बजावावा, यासाठी पालिकेने जनजागृती केली आहे. तसेच या दिवशी औद्योगिक भागातील कंपन्यांमधील कामगारांनादेखील मतदान करता यावे, याकरिता सुट्टी जाहीर करण्याचा आदेश दिला आहे.

या पार्श्वभूमीवर मावळ किंवा शिरूर लोकसभा मतदार संघात वास्तव्य असलेल्या महापालिका सेवेतील कर्मचार्यांना मतदान करता यावे, याकरिता सार्वजनिक सुट्टी देण्याचे परिपत्रक पालिका आयुक्त शेखर सिंह यांनी काढले आहे. पालिकेचे जे कर्मचारी, अधिकारी हॉस्पिटल, अग्निशामक दल, पाणीपुरवठा, सुरक्षा व्यवस्था या अत्यावश्यक सेवेत येतात, ते कर्मचारी मतदानापासून वंचित राहू नयेत. त्यांना आपला मतदानाचा अधिकार बजाविता यावा, यासाठी आवश्यक ते नियोजन करण्याचे आदेश आयुक्त सिंह यांनी दिले आहेत.

# 'ब्रेक डाऊन'मुळे पिंपरी-चिंचवड आगार 'नर्व्हस'

## दिवसाला एक ते दोन गाड्या पडताहेत मार्गावरच बंद : आगाराचे नियोजन कोलमडले, प्रवाशांनाही नाहक मनस्ताप



**पिंपरी | प्रतिनिधी**

एसटीच्या पिंपरी-चिंचवड आगारात एकीकडे प्रवाशांच्या मानाने वाहनांचा तुटवडा आहे. त्यातच दिवसाकाठी हमखास एक ते दोन बस वारंवार ब्रेक डाऊन होत असल्याने उन्हाळी विशेष फेऱ्यांची नियोजन कोलमडत आहे. परिणामी, लांब पल्ल्याच्या मार्गावर प्रवाशांना तासनतास वाट पाहावी लागत असल्याचे चित्र आगारात दिसून आले.

उन्हाळी सुट्टीचे एसटी आगाराकडून नियोजन करण्यात आले आहे. यानिमित्त नाशिक, चिपळूण यासह विविध मार्गावर अतिरिक्त बस सोडण्यात येत आहेत. त्यामुळे उपलब्ध असलेल्या बस कमी पडत आहेत. त्यातच दिवसाकाठी हमखास एक ते दोन एसटी ब्रेक डाऊन होत आहेत. त्यामुळे काही मार्ग वगळावे लागत असल्याने प्रवाशांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे. मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र या भागात वाहनांचा मोठा तुटवडा आहे. बंद पडलेल्या बस वेळेवर दुरुस्त होत नसल्याने, लांबचे मार्ग रद्द करून इतर मार्गावर ती सेवा वळवावी लागत आहे.

दुसरीकडे कार्यशाळेत मनुष्यबळाचा तुटवडा असल्याने चाळीस जणांचा कार्यभार पंचवीस कारागीरच पार पाडत आहेत. त्यामुळे आगारातील एस.टी. गाड्यांची दैनंदिन तपासणी करताना उपलब्ध कर्मचाऱ्यांवर ताण पडत आहे. परिणामी गाड्या ब्रेक डाउन होण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यातच अनुपस्थिती आणि कामगार वारंवार सुट्ट्या घेत असल्याने वेळेवरती एसटी दुरुस्त होत नसल्याने त्या मार्गावर येत नाहीत. त्यातच पिंपरी-चिंचवड आगारात कर्मचारी तुटवडा असताना, दोन कर्मचारी दापोडी येथील मध्यवर्ती कार्यशाळेत पाठवण्यात आले तर तिघांनी राजीनामा दिला आहे.

दरम्यान, प्रत्येक आगारातून दैनंदिन बसेसची माहिती, प्रवासी आणि नादुरुस्त बसची संख्या याबाबत विभागीय कार्यालयाकडून माहिती मागवण्यात येत आहे. त्यात सुधारणा करण्याबाबत आगार प्रमुखांना सूचना करण्यात आलेली आहे. त्याबाबत सकाळी आढावा बैठक घेण्यात येत असते.

# पुणे विमानतळाच्या नवीन टर्मिनलचं ‘उड्डाण’ कशामुळं रखडलं

## शिरूरचे निवडणूक अधिकारी अजय मोरे यांच्या उपस्थितीत उमेदवारांना निवडणूक चिन्हांचे वाटप




**पुणे | प्रतिनिधी**

पुणे विमानतळाच्या नवीन टर्मिनलची सुरुवात मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात होण्याची शक्यता आहे. भारतीय विमानतळ प्राधिकरणाने सुरुवातीला दोन विमान कंपन्यांची उड्डाणे नवीन टर्मिनलमध्ये सुरू करण्याची योजना आखली आहे. ही उड्डाणे सुरळीतपणे सुरू झाल्यानंतर टप्प्याटप्प्याने इतरही विमान कंपन्यांची उड्डाणे नवीन टर्मिनलमधून सुरू होतील. त्यामुळे एकाचवेळी जुने आणि नवे टर्मिनल सुरू राहणार आहे.

पुणे विमानतळावरील नवीन टर्मिनलचे उद्घाटन १० मार्चला झाले. त्यानंतर महिनाभर नवीन टर्मिनलवर चाचण्या घेण्यात आल्या. यानंतर टर्मिनलवरील सेवा सुरू करण्यास नागरी हवाई वाहतूक सुरक्षा विभागाकडे (बीसीएएस) प्रस्ताव पाठविण्यात आला. बीसीएएसच्या पथकाने नवीन टर्मिनलची पाहणीही केली आहे. मात्र, अद्याप त्यांच्याकडून सेवा सुरू करण्यास मंजुरी मिळालेली नाही. ही मंजुरी लवकरच मिळण्याची चिन्हे असून, मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात नवीन टर्मिनल सुरू होण्याची शक्यता आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली.

नवीन टर्मिनलवर पहिल्या टप्प्यात एअर इंडिया आणि एअर इंडिया एक्स्प्रेस या दोन विमान कंपन्यांचे उड्डाण सुरू होईल. प्रत्येक दिवशी विमानांच्या ३२ फेऱ्या करण्याचे नियोजन आहे. इतर विमान कंपन्यांचे उड्डाण जुन्या टर्मिनलवरून सुरू राहील. नवीन टर्मिनलवरून कोणतीही तांत्रिक अडचण न येता उड्डाणे सुरू करण्यात यश आल्यानंतर टप्प्याटप्प्याने इतर कंपन्यांच्या विमानांची उड्डाणेही नवीन टर्मिनलवरून सुरू होतील. त्यामुळे जुने आणि नवे टर्मिनल एकाचवेळी सुरू राहील, असेही सूत्रांनी स्पष्ट केले.

### अतिरिक्त सुरक्षेचीही प्रतीक्षा

**» नवीन टर्मिनल सुरू करण्यासाठी केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाचे (सीआयएसएफ) दोनशेहून अधिक अतिरिक्त मनुष्यबळ लागणार आहे. याला मंजुरी मिळाली आहे. मात्र, प्रत्यक्षात हे जवान अद्याप तैनात करण्यात आलेले नाहीत. टर्मिनल सुरू करण्यासाठी सुरक्षेसाठी हे जवान तैनात होणे आवश्यक आहे, असेही सूत्रांनी नमूद केले.**

“ पुणे विमानतळाच्या नवीन टर्मिनवरील खानपान सेवेच्या दालनांना नागरी हवाई वाहतूक सुरक्षा विभागाची मंजुरी प्रलंबित आहे. खानपान सेवा नसल्याने नवीन टर्मिनलवरून प्रवासी वाहतूक सुरू करता येणार नाही. ही मंजुरी मिळाल्यानंतर टप्प्याटप्प्याने नवीन टर्मिनल सुरू होईल.

**- संतोष ढोके, संचालक, पुणे विमानतळ.**

# शिरूर लोकसभा निवडणूकीसाठी 32 उमेदवार रिंगणात

## निवडणूक अधिकारी अजय मोरे यांच्या उपस्थितीत उमेदवारांना निवडणूक चिन्हांचे वाटप



**पुणे | प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाच्या निवडणूक कार्यक्रमानुसार शिरूर लोकसभा मतदारसंघासाठी अर्ज माघारी घेण्याच्या अंतिम मुदतीनंतर नामनिर्देशन पत्र वैध ठरलेल्या ३५ उमेदवारांपैकी ३ उमेदवारांनी नामनिर्देशन पत्र मागे घेतल्याने शिरूर लोकसभेसाठी ३२ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. आज अंतिम करण्यात आलेल्या यादीनुसार उमेदवारांना निवडणूक निर्णय अधिकारी अजय मोरे यांच्या उपस्थितीत निवडणूक चिन्हांचे वाटप करण्यात आले.

यावेळी निवडणूक निरीक्षक कुमार सौरभ राज, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी रेवणनाथ लबडे आदी उपस्थित होते. चिन्ह वाटपानंतर श्री. मोरे यांनी उमेदवारांना निवडणूक नियमांची माहिती दिली. निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार उमेदवारांना ९५ लाख खर्च करण्याची मर्यादा आहे. उमेदवारांकडून खर्च मयदिचे उल्लंघन होता कामा नये. नामनिर्देशन पत्र दाखल केल्यापासून खर्च गणना केली जाईल. उमेदवारांनी आदर्श आचारसंहितेचे पालन करावे. वाहने, सभा, रॅली, मिरवणूकीसाठी पूर्व परवानगी आवश्यक आहे.

प्रचार कालवधीमध्ये केवळ रुपये १० हजारापर्यंतचा खर्च रोखीने करता येईल, १० हजारांवरील खर्च धनादेशाद्वारे करता येईल, निवडणूक यंत्रणेमार्फत भरारी पथके स्थिर सर्वक्षण पथके तसेच व्हिडीओ संनियंत्रण पथकाद्वारे नियंत्रण ठेवण्यात येईल. शिरूर लोकसभा मतदारसंघात एकूण २ हजार ५०९ मतदान केंद्र आहेत. उमेदवारांनी प्रत्येक मतदान केंद्रावर दोन मतदान प्रतिनिधी नियुक्त करावेत, अशा सूचना श्री.मोरे यांनी केल्या.

उमेदवारांसाठी निवडणूक प्रचाराची वेळ सकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंतची असेल. दोन धर्मात समाजात तेढ निर्माण होईल असा प्रचार करू नका किंवा देव देवतांचा, धार्मिक चिन्हाचा प्रचारात वापर करू नये. मतदानापूर्वी ४८ तास प्रचार थांबविण्यात यावा. आचार संहितेचा भंग होत असल्याचे निदर्शनास आल्यास निवडणूक कार्यालयाकडे तक्रार करावी. मतदानाच्या दिवशी सकाळी साडे पाच वाजता मतदान प्रतिनिधी मतदान केंद्रावर उपस्थित राहणे आवश्यक आहे. मतदानाच्या दिवशी सकाळी साडे पाच वाजता मॉक पोल घेतले जाईल.

मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रापासून २०० मीटर अंतरावर उमेदवारांनी त्यांचा बुथ लावणे आवश्यक आहे. बुथ लावण्यासाठी संबंधित ग्रामपंचायत, नगरपालिकेकडून उमेदवारांनी परवानगी घ्यावी, अशा सूचना देवून लोकसभा निवडणूक पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहनही श्री.मोरे यांनी केले.